# <u>वादी तर्फे सा.क्र.१</u>

**<u>नि.दि.दावा क्रमांक ५१८/२०२५</u>**
**<u>निशाणी क्रमांक ६०  लगत</u>**

## <u>उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. सपकाळ यांच्या मार्फत</u>

**०४.** दावा मिळकतीच्या आजुबाजुने कोणाच्या जमीनी आहेत याची मला माहीती आहे. मी सुधाकर रामभाऊ शिरसाठ यांना ओळखतो. माझया व सुधाकरच्या जमीनीच्या पश्चीम बाजुने सरकारी रस्ता आहे, तो मांजरी येथुन मेंढी भालगाव या गावाला जातो. हे म्हणणे खरे आहे की, सुधाकर याच्या जमीनीच्या पुर्व बाजुला प्रतिवादी माघाडे यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, याच्या जमीनीच्या दक्षीणेकडून कसाणे यांची जमीन होती, ती नंतर खंबाट यांनी विकत घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर रस्त्याला सुध्दा लागुन मांजरी मेंढी भालगाव हा सरकारी रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, खंबाट यांच्या पुर्व बाजुने शिवाजी व रुखमणबाई ढंगारे यांची जमीन आहे.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, माझया व प्रतिवादींच्या सामाईक बांधावरुन असणाऱ्या रस्त्याच्या कारणावरुन आमचा वाद आहे. साक्षीदाराला प्रश्न विचारला की, तुमच्या वप्रतिवादीच्या शेताच्या मधुन कॅनॉलची चारी गेलेली आहे, साक्षीदार सांगतो की, चारी आहे परंतु ती प्रतिवादीच्या बाजुने गेलेली आहे. मी दाव्यासोबत दाखल केलेला दावा मिळकतीचे वर्णन / वस्तुस्थीती नकाशा मध्ये चारीबददलचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यासोबत जोडलेल्या नकाशामध्ये पुर्णपणे माहीती दिलेली आहे.

**०६.** हे मला माहीत नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी माझया व सुधाकर याच्या शेताच्या बांधावरुन रस्ता खुला करुन मिळावा म्हणुन तहसीलदार गंगापूर यांच्याकडे अर्ज दिला होता किंवा काय. मला आजपर्यंत कधीही त्याबाबत माहीती मिळालेली नाही. मी तहसील कार्यालयामध्ये म्हणणे अथवा आक्षेप दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता मोकळा करण्यासाठी जेव्हा सरकारी अधिकारी कर्मचारी शेतावर आले तेव्हाच मला कार्यवाहीबाबत माहीती मिळाली.

**०७.** हे म्हणणे खरे नाही की, पुरावा शपथपत्रातील परीच्छेद क्र. ४ मधील तहसीलदार कार्यालयातील कार्यवाहीबाबतचा मजकुर खोटा व चुकीचा नमुद केलेला आहे. हे मला माहीती नाही की, तलाठी यांनी शेतात मोक्यावर येऊन पंचनामा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्यावेळी शेतात हजर राहण्यासाठी नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची

नोटीस ही माझया मुलाने स्वीकारली होती. हे म्हणणे खरे नाही की, तहसीलदार कार्यालयात झालेल्या कार्यवाहीबाबत मला व मुलाला नोटीस मिळाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी तहसीलदार समोर हजर राहून एक चाकोरी रस्ता माझया शेतातुन व एक चाकोरी रस्ता सुधाकर याच्या शेतातुन प्रतिवादींचा रस्ता द्यावे म्हणुन तयारी दर्शवली होती.

**०८.** तहसीलदार यांनी दिलेला न्यायनिर्णय वाचण्यासाठी मला मिळालेला नाही. मी तहसीलदार यांनी दिलेल्या आदेशाच्या प्रमाणीत प्रती या प्रकरणात दाखल केलेल्या नाहीत. तहसीलदार यांनी काय निर्णय दिला, त्या प्रकरणामध्ये काय कागदपत्रे झाले याची मला काहीही माहीती नाही. सददाम लतीफ शेख हा माझा मुलगा आहे. साक्षीदाराला विचारले की, मुलाची सही तुम्ही ओळखू शकतात का, साक्षीदार सांगतो की, तो कधी मराठीत सही करतो कधी इंग्रजीत सही करतो. वादींनी दाखल केलेले कागदपत्र यादी निशाणी क्र.४ सोबत दाखल केलेले ७ व्या क्रमांकाचे पंचनाम्यावर माझया मुलगा सददाम याचे नाव नमुद केलेले दिसुन येत आहे, परंतु सही त्याची आहे किंवा नाही हे मला सांगता येत नाही. मी व सददाम आज रोजी एकाच घरात राहतो. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावरील सही सददाम याची असल्यामुळे त्याला व त्याच्याकडून मला पंचनाम्याबाबत सगळी माहीती होती.

**०९.** आता मला निशाणी ४६ वरील कागदपत्रे यादीमधील कागदपत्र क्र. १० तहसीलदार कार्यालय गंगापूर यांच्याकडील कार्यवाहीचा दि.१०/०८/२०२१ रोजीचा रोजनाम्याची प्रमाणीत प्रत दाखवली. त्यावरील सही माझी आहे. सदरचा रोजनामा **निशाणी क्र.७७** वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तहसील कार्यालयात नोटीस मिळाल्यानंतर मी तहसील कार्यालयात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तहसीलदार यांनी आमच्याकडे आदेशापुर्वी विचारपुस केली होती. तहसीलदार यांनी मला जबाब दाखल करण्यास सांगीतले नाही व मी देखील जबाब दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तहसीलदार यांच्या कार्यालयात बाजु मांडण्यासाठी मी वकील नेमले होते. हे म्हणणे खरे नाही की, वकीलांनी मला म्हणणे दाखल करणेबाबत सांगीतले होते. मी स्वत:हुन काहीही माहीती घेतली नाही. साक्षीदाराला प्रश्न विचारला की, तुम्ही तहसीलदार कार्यालयात म्हणणे दाखल करण्यास सांगूनही म्हणणे दाखल केले नाही, साक्षीदार सांगतो की, वकीलांनी मला तसे काहीही सांगीतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला तहसील कार्यालयातील प्रकरणाच्या प्रती मिळाल्या होत्या व त्या स्वीकारल्याबाबत त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला संपुर्ण माहीती

मिळूनसुध्दा व तहसीलदार यांनी पुरेपुर संधी देऊनही जाणीवपुर्वक म्हणणे दाखल करण्यासाठी दुर्लक्ष केले.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीच्या व आमच्या शेतामध्ये कॅनॉलची चारी असल्यामुळे कोणीही एकमेकाच्या शेतावर अतिक्रमण करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, तहसीलदार यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाप्रमाणे मी व सुधाकर याने प्रतिवादींना रस्ता मिळावा म्हणुन एक चाकोरी जागा देण्याचे तहसीलदारांच्यासमक्ष मान्य केले होते. हे म्हणणे खरे नाही की, तहसीलदार यांच्या कार्यालयात कार्यवाही झालेली असल्याने न्यायालयात येण्यास कारण नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांची पुर्वीपासुनची जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुर्वीपासुन प्रतिवादी माझया व सुधाकरच्या बांधावरुन पुढे त्याच्या शेतात जातात. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या शेतातुन कॅनॉलची चारी गेल्यामुळे मी पुर्वीच्या रस्त्याची जागा नांगरुन रस्ता बंद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया मजुकुराचा दावा व नकाशा दाखल केला आहे.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, मला प्रतिवादींना रस्ता नसल्यावर त्यांनी जमीन विकावी व ती जमीन मला मिळावी अशी आशा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांचा हक्काचा रस्ता अडवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा रस्ता अडवण्याच्या उददेशाने खोटा मजकुराचे पुरावा शपथपत्र दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा त्रास नसतांनाही मी विनाकारण दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2025.11.10 11:15:43 +0530

दिनांकः- ०६.११.२०२५

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर